Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VII July 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# कास पुष्प पठाराचे संवर्धन व संरक्षण एक भौगोलिक विश्लेषण

**डॉ. सुनिता एस. शिंदे**
सहयोगी प्राध्यापक
भूगोल विभाग प्रमुख
श्रीमती सुशिलादेवी देशमुख महिला महाविद्यालय,
लातुर.

**अभिमन्यु वसंतराव**
संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
E-mail- avjtalbhog11@gmail.com

## प्रस्तावना :

युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषीत केलेल्या कास पुष्प पठार एक नैसर्गिक साधनसंपदेने नटलेला आहे मानवाला मोठ्या प्रमाणात उपयोगी पडत असलेले दिसून येते. जैवविविधता हा नैसर्गिक साधनसंपदेचाच एक भाग आहे. पृथ्वीवर वेगवेगळ्या परिसंस्था अढळतात जसे की, जंगल , गवताळ, वाळवंटी, पर्वतीय व तसेच जलीय परिसंस्था नदीय, सरोवरीय आणि सागरी यांसारखे विविध प्रकार आढळतात.

भारतामध्ये वेगवेगळ्या प्रदेशात अशा परिसंस्था आढळतात. महाराष्ट्र राज्य हे अद्वितीय जैवविविधता आणि बालाघाट डोंगररांगा जसे की पश्चिम घाट यांसाठी ओळखतात. त्यापैकी कास पूष्प पठार हे अद्वितीय जैवविविधता असलेले एक प्रेक्षणीय स्थळ आहे.

'कास पुष्प पठार' हे पश्चिम घाटातील बालाघाट डोंगररांगामध्ये वसलेले दुर्मिळ ठिकाण आहे. या पठाराला पर्यावरणीयदृष्ट्या व पर्यटनदृष्ट्या खुप महत्त्व आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात फुलांचा हंगाम चांगालाच बहरत असल्यामुळे त्या दिवसांत पर्यटक, वैज्ञानिक आणि निसर्ग प्रेमी, पर्यटन करत असतात कास पुष्प पठाराचे महत्त्व फक्त राज्यस्तरावर नाहीतर जागतिक स्तरावर दखल घेवून जून २०१२ मध्ये युनोस्कोत जागातिक वारसा स्थळ म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे कास पूष्प पठार प्रकाशझोतात आले. पर्यटनातील महत्व पर्यावर स्थळाशी घनिष्ट संबंध येतो. व विविध परिसरांतील गुणवत्तेच्या परिणामामुळे पर्यटक आकर्षीत झालेले असतात.

● **अभ्यास क्षेत्र :**

कास पुष्प पठार हे एक महाराष्ट्रातील पर्यटनस्थळ वायव्य डोंगर रांगामध्ये वसलेला असून हे सह्याद्री पर्वतरांगात निसर्गाने भरभरुन दिलेला खजीनाच आहे. ही नैसर्गिक संपत्ती महाराष्ट्राला लाभलेली आहे.

अक्षवृत्तीय - १७°४'उत्तर ते १७°४५' उत्तर, रेखावृत्तीय - ७३°४७' पूर्व ते ७३°५६' पूर्व, क्षेत्रफळ-१७४२ हेक्टर, समुद्र सपाटीपासून उंची १२०० मिटर, वार्षिक पर्जन्य - २५०० मि.मि. आहे. व सातारा जिल्ह्यापासुन २६ कि.मी. अंतरावर सह्याद्रीच्या रांगातील कास पूष्प पठाराचे भौगोलिक माहितीचा अभ्यास खालील प्रमाणे :

कास पुष्प पठार हे १७४२ हेक्टरवर पसरलेला असून या पठारावर अत्यंत दूर्मीळ वनस्पती सुमारे ८५० पेक्षा अधिक पुष्पाचे प्रकार आढळुन आले आहेत. व विविध प्रकारांच्या ३२ प्रजाती आढळतात.




ज्वालामुखी पठार हे ज्वालामुखी क्रियांमुळे निर्माण होतात. कोलंबियाचे पठार, दख्खनचे पठार व सातारा जिल्ह्यातील कास पठार हे ज्वालामुखी पठाराची उदाहरणे आहेत.

- **उद्दिष्ट्ये :**

१. कास पुष्प पठारावरील जैवविविधतेवरील समस्या व उपाय अभ्यासणे.

२. कास पुष्प पठार या जैवविविधतेच्या संवर्धनाचा अभ्यास.

३. पर्यटनस्थळावर होणाऱ्या परिणामावर उपाय योजने.

**पर्यटनासाठी महत्वाचे घटक :** आवास, दळणवळण, व्यवस्था, तसेच ट्रॅव्हल्स ऐजंट वाहणे असे अनेक घटक आहेत.

**संशोधन पद्धती :**शोध पत्रासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला जाणार असुन मिळालेल्या माहितीच्या अधारे विश्लेशनात्मक पद्धतीचा वापर केला आहे. सांख्यिकीय विभाग प्रकाशीत साहित्य यांचा वापर दुय्यम स्त्रोतामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. व स्थानिक लोक, व्यवस्थापक कर्मचारी प्राथमिक स्त्रोत पर्यटन स्थळाचा विकास आणि योजनेशी संबंधीत माहिती व आकडेवारी गोळा केलेली आहे.

**कास पुष्प पठार :**महाराष्ट्रातील पश्चिमघाटाला पठार, गवताळ प्रदेश व वनस्पती ही देणगी लाभलेली आहे कास पठार त्यापैकी एक आहे. साताऱ्यापासून २५ किमी अंतरावर सह्याद्रीमध्ये वसलेले आहे. कास हे महाराष्ट्रातील फुलांची दरी म्हणूनही ओळखले जाते.

कास पूष्प पठाराला कास हे नाव देण्यामागे अनेक कथा आहेत. एक म्हणजे कास हे झाड कास येथील घनदाट जंगलात सापडले त्यामुळे कास पठार हे नाव दिले तर दुसरे म्हणजे स्थानिक लोकांकीका म्हणजे तेथे सरोवर असल्याने

त्याला कास नाव दिले. कास सरोवर हे सुमारे १०० वर्षापूर्वी बांधले गेलेले आहे. हे पठार ३ मोडी नदीच्या उगम असून पश्चिम भाग सातारा शहरास बारमाही पाणी पुरवीते. कास पठार हे बेसॉल्ट खडकाचे व कातळ खडकाचे कमी प्रमाणात माती व अन्य द्रव्ये असलेले पठार आहे. या ठिकाणी झाडे उगवत नाहीत. मात्र पावसाळ्यात रानफुले व पुष्पवैभव सर्वानाच जादूमय भुरळ घालतात.

**कास पठाराचे भौगोलिक वर्णन खालील प्रमाणे :**

**कासची भूगर्भीय वैशिष्ट्ये :**कास पठार हे खडकाळ जमीनीच्या वर आलेला स्तर आहे. कास पठाराला सडा (SADA) असे ही संबोधले जाते. कास पठार हे अति पर्जन्याच्या क्षेत्रात येतो. त्यामुळे याठिकाणी विविध प्रकारच्या जीवसंहती आढळतात.

**कास पठाराची पर्यावरणीय वैशिष्ट्ये :** या पठारावर वेगवेगळ्या वनस्पती आढळतात. तसेच जागतिकदृष्ट्या कास पुष्प पठार हे जैवविविधतेचे हॅाटस्पॅाट बनले आहे. या पठवर सदाहरित वनस्पती आढळून येतात. तसेच काटेरी झुडपे अशी दोन वैशिष्ट्ये आहेत.

या पठारावर वैद्यकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्व असलेल्या औषधी वनस्पती आढळतात.

- कास पठार हे पर्यावरणीय आणि जैविकदृष्ट्या संपन्न असलेले ठिकाण आहे या ठिकाणी वेगवेगळ्या प्राणी व वनस्पती यांचा समुदाय आढळतो.
- या पठारावरील दुर्मिळ प्रजातींचे विविध प्रकार आढळतात.

**कास पठारातील वनस्पती व प्राणी :**







वरील सर्व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर कास पुष्प पठारावरील विविध वनस्पती व प्राणी यांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की सुमारे ४५० पेक्षा अधिक पुष्प वनस्पतींचे प्रकार आढळून आले आहेत. यामध्ये अनेक वनस्पती अत्यंत दुर्मिळ आहेत. आणि तसेच किटक व विविध प्रकारच्या फुलपाखरांच्या ३२ प्रजाती आढळतात. सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १९ प्रजाती, सस्तन प्राण्याच्या १० प्रजाती आणि पक्षांच्या ३० प्रजाती येथे आढळून येतात.

कास पुष्प पठार आणि कोयना जवळचा भाग हा जवळपास १५०० प्रकारच्या वनस्पतींचा आहे.६८० जेनेरा १४५२ वनस्पती, ४०० औषधीवनस्पती आणि जवळपास ३३ दुर्मिळ वनस्पती प्रकार ४५० पेक्षा जास्त पुष्पवनस्पती पावसाळ्यात आढळतात या अत्यंत औषधी असून सुमारे ८५० पेक्षा अधिक पुष्प वनस्पतीचे प्रकार आहेत. त्यापैकी ६२४ प्रजातींची नोंद रेड डाटा बुकमध्ये झाली असून जवळपास ३९ प्रकारची फुले असणाऱ्या प्रजातीची नोंद या रेड डाटा बुकमध्ये झालेली आहे. या दुर्मिळ प्रजातींचे संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे.

कास पुष्प पठारावरील लक्षावधी फुले विविध रंगांनी विविध ढंगांनी उगवतात. जुन महिना संपताच कास पठारावर सड्याचा चमत्कार दिसू लागतो.

या पठारावर दोन तुऱ्याची मयतुरा ही वनस्पती दिसते. हीच ती ऍपोनोजेटोन सातारन्सीस म्हणजे सातारा कास स्पेशल फुले आहेत. तसेच पिवळी सोनकी आणि कळयाची मिमीमाउस सारखी स्थितियाचे फुले उगवतात. काही फुले दरवर्षी येतात तर काही फुले दरसात किंवा नऊ वर्षांनी येतात. दर नऊ वर्षांनी फुलणारी टोपली कार्वी हे तर कास पठाराचे वेगेळे वैशिष्ट्ये आहे. या पठारावर कंदी पुष्पांचे विविध प्रकार निचुर्डी, अबोलिमा, ब्युगोनिया, दीपकांडी, चवर, गौरीहार, रानहळद, नागफणी, सापकांदा ड्रॅासेरा इत्यादी फुले आढळतात.

**समस्या :** वर्तमानकाळात वाढत्या लोकप्रियतेमुळे कास पठार हे पर्यटकांनी गजबजलेले दिसते परंतू त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम येथील जैववीविधतेवर पडतो. तज्ञांच्या विश्लेषणानुसार व निरीक्षणानुसार अनेक प्रकारच्या समस्या कासच्या जैवविविधतेवर परिणाम करतात. त्यापैकी पर्यटन ही महत्वाची समस्या असून जी लाखो पर्यटक व प्रत्येक वर्षी हजारो वाहने यामुळे निर्माण झालेली आहे. वाढत्या वाहनाच्या संख्येमुळे कास पठार येथील प्राणी व वनस्पती या प्रजाती नामशेष होताना दिसतात. काही महत्त्वाच्या समस्या खालील प्रमाणे.

**प्रदुषण व टाकाऊ वस्तूचे व्यवस्थापन :**युनेस्कोच्या प्रस्तावानुसार फक्त २००० पर्यटक एका दिवशी कास पठारास भेट देवू टाळतात. परंतू ऑगस्ट आणि ऑक्टोबरच्या दरम्यान फुलांच्या हंगामात, सुय्याच्या दिवशी जवळपास ५०००० पर्यटक भेटी देतात त्यामुळे पर्यटनामुळे महत्वाची समस्या आहे. पर्यटक हे बऱ्याच अंतरावरून येतात व मोटार गाडी दुचाकी इत्यादी वाहनांनी येतात. वाढत्या वाहतुकीमुळे येथे हवा व ध्वनी प्रदूषणाची समस्या निर्माण होते. येथील ध्वनी प्रदुषणामुळे प्राणी व पक्षी यांचे जीवमान बदलेले आहे. मानवी हस्तक्षेपामुळे प्लास्टिक बाटल्या, शीतपेयाच्या बाटल्या, फेकुन टाकलेले अन्न कचरा यामुळे प्रदूषण होत आहे.

**जैवविविधतेस अडथळा :** वैज्ञानिक व संशोधक याकरीता कास पठार हे महत्त्वाची नैसर्गिक देणगी आहे. जर दुर्मिळ प्रजातींचे सरंक्षण केले नाही तर येणाऱ्या ३-५ वर्षात या नामशेष होतील. हे संरक्षण व संवर्धन केवळ फुलांच्या हंगामात न करता वर्षभर केले गेले पाहिजे.

खालील महत्वाच्या समस्या कास पठाराची सुंदरता बिघडवतात.

**वाहतुक :** कास पठारावर पार्किंग व रस्ते यांची योग्य सोय नसल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे.

**खाणकाम :** कास पठार बॉक्साइट खनिजांनी संपन्न आहे. परंतू खाणकामामुळे येथिल परीसंस्थेचे नुकसान होत आहे.

**पवनचक्की ची उभारणी :** पवनचक्की हे उर्जा निर्माण करते परंतु त्याची उभारणी पठारावर केल्याने येथील परिसंख्या बदलते. यामुळे नदी प्रणाली व रस्ते यांवरही परिणाम होतो.

**गुरेचराई :** रोजच्या गुरेचराईमुळे मृदेचा पोत घसरून येथील वनस्पतींवर त्यांचा विपरीत परीणाम होतो.

**उपाय :**

**संवर्धनात्मक उपाय :**कास पठाराचे पर्यावरणीय महत्व व भविष्यातील समस्या लक्षात घेता त्या कमी करण्याकरता तेथील लोक, प्रशासन व गैर प्रशासन क्षेत्राचा संबंध या पठाराच्या संवर्धनासाठी महत्वपूर्ण आहे. येथील स्थानिक लोकांच्या सहभागातून पर्यटनावर नियंत्रण आणणे महत्त्वाचे आहे.

**कास पठार संवर्धनात वनविभागाची भूमिका :**

वन विभागाने कास पठाराच्या संवर्धनास व सरंक्षणाकरीता ८.७३ करोड रूपये खर्च करून पंचवार्षिक कृती आराखडा तयार केलेला आहे. वन विभागाने रोडच्या बाजुने कुंपन घातलेले आहे. तात्काळ उपाययोजना म्हणून वनविभागाने पर्यटन नियंत्रणासाठी ऑनलाईन नावनोंदणी आवश्यक केली आहे. जेणेकरून दर दिवशी फक्त २००० पर्यटक भेट देवू शकतात. ज्यामुळे पर्यटकांची गर्दी कमी होईल व या पठाराचे जैवविविधता जोपासली जाईल.

**पार्किंगची सोय :** स्वच्छता गृहाची पिण्याच्या पाण्याची व प्रशिक्षीत मार्गदर्शकांची व्यवस्था कास पठारावर करण्यात आले आहे.

**पर्यटकाची जबाबदारी :** पर्यावरणप्रेमी पर्यटक कास पठाराला भेट देताना खालील उपाय घ्यावेत.

१. वनस्पती व फुलांवरून चालू नका

२. फुले तोडू नका किंवा चुरगाळू नका लक्षात ठेवा फुले हीच येथील सौंदर्य आहेत आणि ते आपल्या स्वतातल्या बागेतील नाहीत.

३. पठाराच्या उरल अंतरावर वाहने पार्किंग करु नका

४. काळजीपूर्वक वाहनेचालवा जेणेकरून वाहनाखाली प्राणी चिरडले जाणार नाहीत

५. वाहनाची गती १० ते २० कि.मी. प्रती तास ठेवा

६. पठारावर प्लॉस्टिक बाटल्या अन्नाचे तुकडे किंवा चॉकलेटचा पेपर वगैरे फेकु नका.

७. पठारावर जेवण करू नये

८. पठारावर मद्यपान आणि धुम्रपान करू नये

९. संगीताचा वापर शक्यतो टाळावेत.

१०. जबाबदार पर्यटनाच्या संदेशाचा प्रसार केला पाहिजे. मोटारीचा आवाज टाळावा.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. विठ्ठल घारपूरे (जुन २००१) पर्यटन भूगोल, पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर - पेज. नं. १४

२) यशोधरा भोसले : (२००५) प्रवास पर्यटनाचे नवे पैलू, मेहता पब्लीसींग हाऊस पुणे पेज नं. ५

३) www.kass pathar.kas.com

४) www.MTDC.com